# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

विषय :— "उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..."

संदर्भ :— मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे संदर्भ पत्र. क्र. महाडीबीटी २०२४—२५/शिष्यवृत्ती शाखा/ , दि. १८/०१/२०२५.

या परिपत्रकाद्वारे सर्व मा. प्राचार्य/मा. संचालक, संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रान्वये मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांनी कळविले आहे की, महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जांची पडताळणी महाविद्यालय स्तरावरून करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रकाव्दारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मा. सहसंचालक कार्यालयामार्फत वॉट्सॅप वर जिल्हानिहाय ग्रुपमध्ये वारंवार सुचनाव्दारे कळविण्यात येत आहे. तरीही असे निदर्शनास आले आहे की, कोणत्याही प्रकारची तपासणी/छाननी न करताच महाविद्यालये/परिसंस्थांच्या स्तरावरील अर्जांची संख्या कमी करण्यासाठी, शिष्यवृत्ती अर्ज जसेच्या तसेच मा. सहसंचालक कार्यालय स्तरावर पाठविण्यात येत आहेत. मा. सहसंचालक स्तरावर सर्वसाधारणपणे उदाहरणादाखल मुद्दे संदर्भीय पत्रात नमूद केले आहेत. तथापि, याशिवाय सुध्दा अनेक तृटी आढळून येत आहेत, असेही त्यांनी त्यांच्या पत्रात नमूद केले आहे. सोबत पत्राची प्रत जोडली आहे.

सबब, मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, सर्व महाविद्यालयातील नोडल अधिकारी यांनी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जातील सर्व बाबी तपासून छाननी / तपासणी करूनच मा. सहसंचालक स्तरावर पाठवावे. अन्यथा मा. सहसंचालक कार्यालयाकडून नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवर त्याचा परिणाम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय/परिसंस्था यांची राहील याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/ ३६०
दिनांक : ०५/०२/२०२५

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

सोबत:— वरिलप्रमाणे.

प्रत: मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी २०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/ दिनांक : १८.०१.२०२५

**तात्काळ / अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : -उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं- शिष्य / २०२४-२५ दि. १०.०१.२०२५ .

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जांची पडताळणी महाविद्यालय स्तरावरुन करणेबाबत वेळोवेळी परिपत्रकाद्वारे तसेच सूंचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वॉट्सॅप वर जिल्हानिहाय गृपमध्ये वारंवार सूचनाद्वारे कळविण्यात येत आहे. तरीही असे निदर्शनास आले आहे की, कोणत्याही प्रकारची तपासणी / छाननी न करताच आपल्या स्तरावरील अर्जांची संख्या कमी करण्यासाठी, शिष्यवृत्ती अर्ज जसेच्या तसेच सहसंचालक कार्यालय स्तरावर पाठविण्यात येत आहेत. सहसंचालक स्तरावर सर्व साधारणपणे उदाहरणादाखल खालीलप्रमाणे मुद्दे आहेत. तथापि याशिवाय सुध्दा अनेक त्रुटी आढळून येत आहेत.

१. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाडीबीटी पोर्टलवर पाठविण्यात येतात.

२. एकाच विद्यार्थ्याची गुणपत्रिका अनेक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडून पाठविण्यात येतात.

३. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या अर्जासोबत सारख्याच आई वडिलांची नावे असलेले कागदपत्र जोडून शिष्यवृत्ती अर्ज पाठविले आहेत.

४. उत्पन्न प्रमाणपत्र जुन्या वर्षांचे जोडलेले असतात, तर काही उत्पन्न प्रमाणपत्र तहसीलदार यांच्या स्वाक्षरीचे नसतात.

५. रहिवासी दाखला, कुटुंब प्रतिज्ञापत्र बरोबर असल्याची खात्री न करताच शिष्यवृत्ती अर्ज पुढील स्तरावर पाठण्यात येतात.

६. ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडलेला आहे. अशा विद्यार्थ्यांचे गॅप सर्टिफिकेट न जोडताच शिष्यवृत्ती अर्ज पुढे पाठविण्यात येतात.

७. उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांकरीता आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त अन्य कागदपत्र जोडण्यात येतात. उदा. जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट व इतर. **उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांकरीता फक्त सदर योजनेसाठी आवश्यक कागदपत्रेच जोडून अर्ज पाठविणे गरजेचे आहे.**

८. शिष्यवृत्तीचे अर्ज करतेवेळी कागदपत्र अपलोड करताना प्रमाणपत्रावरील नाव आणि विद्यार्थ्यांच्या पालकाचे नाव / रक्कम / वर्ष स्पष्ट वाचता येते किंवा नाही, अथवा प्रवेशित विद्यार्थ्यांचेच आहे किंवा नाही याची कोणतीही तपासणी करता शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडतात आणि महाविद्यालय स्तरावरुन तेच शिष्यवृत्ती अर्ज तसेच पुढे पाठवितात.

९. ज्या स्तरावर गुणपत्रिका जोडण्यात येते, त्या स्तरावर एकाच वर्षाची गुणपत्रिका सर्व वर्षांकरिता जोडण्यात येते. उदा. १० वीची गुणपत्रिका १२ वीच्या गुणपत्रिकेच्या जागी अपलोड करण्यात येते.

१०. विवाहित विद्यार्थीनीच्या कागदपत्रांवरील नाव, कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्रावरील नाव, उत्पन्न प्रमाणपत्रावरील नाव, रहिवासी दाखल्यावरील नाव आणि शिष्यवृत्ती अर्जावरील नाव यामध्ये असमानता असते.

११. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडलेल्या उत्पन्न प्रमाणपत्रामध्ये तसेच रहिवासी प्रमाणपत्रामध्ये असलेले पालकांचे नमूद नाव यामध्ये समानता नसतात. तसेच वडिलांचे अथवा आईच्या नावाचे प्रमाणपत्र इंग्रजीमध्ये असल्यास स्पेलिंग चुकीचे असतात. असे कागदपत्र कोणत्याही स्तरावर स्वीकारले जात नाही.

१२. उत्पन्न प्रमाणपत्र आणि रहिवासी प्रमाणपत्र अधिकृत असल्याची तपासणी न करता पुढे पाठविण्यात येतात.

१३. सहसंचालक स्तरावरुन महाविद्यालयांना रिव्हर्ट करण्यात आलेले अर्ज कोणतीही पुर्नतपासणी न करता / कागदपत्रांची पूर्तता न करता तेच अर्ज मंजूरीस्तव पाठविण्यात येतात. हे योग्य नाही. याबाबत वारंवार सूचना देऊन, दूरध्वनीद्वारे कळवून देखील कोणताही बदल झालेला दिसून येत नाही.

१४. विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज करताना अभ्यासक्रम निवडताना चुकले असतील तर त्यामध्ये कोणतीही दुरुस्ती महाविद्यालय स्तरावर न करता तेच अर्ज सहसंचालक स्तरावर पाठविण्यात येतात.

१५. कोणत्याही कारणास्तव एखाद्या शिष्यवृत्ती अर्जामध्ये दुरुस्ती आहे असे महाविद्यालयाच्या नोडल अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास संबंधित महाविद्यालय / संस्था / विद्यापीठाने सदर विद्यार्थ्याचे नाव, ॲप्लिकेशन आयडी, योजनेचे नाव, शिष्यवृत्ती अर्ज रिव्हर्ट पाठविण्याकरिता सविस्तर पत्रामध्ये नमूद करुन पत्र ईमेलद्वारे **jdpunescholarship@gmail.com** या ईमेल आयडीवर पाठवावे.

सर्व बाबी तपासून छाननी / तपासणी करुनच अर्ज सहसंचालक स्तरावर पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी आपली असूनही आपण आपली जबाबदारी योग्य रित्या पार पाडत नाही असे दिसून येते. त्यामुळे शिष्यवृत्ती अर्जावर पुढील कार्यवाही करण्यास विलंब होत आहे. याबाबत मा. संचालनालयाकडून विचारणा होत आहे. तरी यापुढे असे निदर्शनास आल्यास नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**तरी सर्व महाविद्यालयातील नोडल अधिकारी यांनी अर्जाची प्रत्यक्ष परीपूर्ण छाननी / तपासणी करुनच सहसंचालक स्तरावर पाठवावे. अन्यथा नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवर त्याचा परिणाम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.**

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 22-01-2025 11:50:27

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.